दिनांक :- १७.०३.२०२१

जाहिरात नमुना

आरोग्य विभाग, राष्ट्रीय आरोग्य अभियान

पुणे जिल्हा परिषद कोविड रुग्णालय, पुणे

पद भरती

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पुणे जिल्हा परिषद कोविड रुग्णालय, पुणे येथे थेट मुलाखतीद्वारे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदे भरणे करीता खालीलप्रमाणे जाहिरात देण्यात येत आहे.

सदर पदांचा तपशिल व शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र	पदाचे नाव	कामाचे ठिकाण	भरावयाची एकुण पदे	शैक्षणिक अर्हता	अनुभव	मासिक मानधन
१	वैद्यकिय अधिकारी	पुणे जिल्हा परिषद कोविड रुग्णालय, पुणे	१०	M.B.B.S.	Nil	60000
२	वैद्यकिय अधिकारी		१०	BAMS	Nil	28000

वरीलप्रमाणे पदांचा तपशिल असुन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन ही पदे भरण्यात येतील.

१) सदर पदभरती ही थेट मुलाखतीद्वारे होणार असुन सदर मुलाखत दिनांक १८.०३.२०२१ ते २२.०३.२०२१ रोजी (सुट्टीचे दिवस वगळुन) सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत होणार आहे.

२) मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी मुळ कागदपत्रे व एक शैक्षणिक कागदपत्रांचा झेरॉक्स सेट सोबत आणावा.

३) भरती प्रक्रिया/परिक्षा स्थगित करणे अथवा रद्द करणे/अंशतः बदल करणे किंवा पदांच्या संख्येत वाढ/घट किंवा बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भातील संपूर्ण निर्णय निवड समिती स्वतःकडे राखून ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

४) कोविड रुग्णांची संख्या लक्षात घेऊन पदांच्या संख्येत बदल केला जाऊ शकतो व कोणतिही पुर्वसुचन न देता कार्यमुक्त करण्याचे अधिकार निवड समितीस राहतील.

५) अपुर्ण कागदपत्रे यांचा विचार केला जाणार नाही.

६) रुजु झाल्यानंतर उमेदवारास जिल्हा आरोग्य सोसायटीकडे १०० रु च्या बॉण्ड पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक आहे.

७) उमेदवाराची निवड करण्याचे अधिकार निवड समितीस राहील. याबाबतचा खुलासा कोणासही देणे बंधनकारक नाही.

८) मुलाखत ६ वा मजला, महात्मा गांधी सभागृह, जिल्हा परिषद, पुणे कॅम्प, वेलस्ली रोड, पुणे याठिकाणी घेण्यात येणार आहे.

९) सर्व उमेदवारांनी दिलेल्या ई मेल आयडी कमीत कमी एक वर्षासाठी चालु ठेवावा. पुढील सर्व पत्रव्यवहार ई मेल द्वारे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

××××सही
आयुष प्रसाद (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे